Indian Streams Research Journal
Vol - I , ISSUE - IX October 2011 ISSN:-2230-7850

# स्त्रीवादी साहित्यातील बंडखोर लेखिकाः मालतीबाई बेडेकर

**प्रा.डॉ.दिपक रिटे**
**विज्ञान महाविद्यालय मराठी विभाग सांगोला, जि.सोलापूर.**

**प्रास्ताविक:-**

मराठी साहित्यामध्ये स्त्री लेखिकांची अतिशय महत्त्वाची कामगिरी आहे. असे असूनही स्त्री साहित्याच्या मर्यादाही खूप आहेत, त्या या आर्थाने की पुरुष प्रधान मानसिकता बदललेला नाही, त्याचा परिणाम दीर्घ काळातही स्त्री, मन साहित्यातून निखळपणे व्यक्त झालेले नाही, हरिभाऊ आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो' च्या नंतर स्त्री समाज प्रवाहाखाली आली आणि धर्माच्या अलिखित परंपरेमुळे केविलवाणे साहित्यातून चित्रित झालेली आहे, आजच्या काळात याचे उदा. म्हणजे तस्लीमा नसरीन होय. हरिभाऊंच्या पूर्वी ताराबाई शिंदे आणि 'यमुना पर्यटनकृत' बाबा पद्मजी यांचे विचार पूरोगामी पणाचे होते, मात्र स्त्री- पुरुषांच्या बरोबरीने यायला हवी हा विचारही ताराबाई शिंदे यांच्या काळात समाजाला पटला नाही. आणि बाबा पदमजींच्या नायिकेला धर्म सोडून दयावा लागला. म्हणजेच समाजमन स्त्री शिक्षणास अनुकूल नव्हते याचेच वरील वास्तव आहे. स्त्रीचे शिक्षण तिचे स्वातंत्र्य आणि तिची महत्त्वाकांक्षा यासंदर्भातील विचार आणि प्रत्यक्षकृतीची जोड इथल्या समाज व्यवस्थेला रुजली नाही. कारण अखंड समाज परंपरावादी पुरुषांच्या स्वाधिन असल्यामुळे दुबळया वर्गाची पिळवणुक हाच त्यांचा न्याय होता.

**स्त्रीवादी साहित्य :-**

मालती बेडेकर यांनी आपल्या साहित्यातून स्त्री मनाचे अतिशय सुक्ष्मपणे निरीक्षण केले आहे. त्यांच्या जाई, शबरी, मनस्वीनिचे चिंतन, विरलेलं स्वप्न, कळयांचे निःश्वास, हिंदोळयावर या साहित्यकृतीतून स्त्री च्या विविध भावविश्वाला प्रत्यक्ष कृतीच्या विचार दिला आहे. आणि त्यामुळेच एकेकाळच्या महाराष्ट्रीय स्त्री मनाला भक्कम आधार दिला. असे आवर्जून म्हटले पाहिजे. मालती बाईंचे एकूण व्यक्तीमत्वं सुधारणावादी आहे. त्यामुळेच त्यांच्या प्रत्येक वाड्:मयीन कलाकृतीतून आधूनिक दृष्टीकोन उभा राहिला. ज्या काळात समाज स्त्रीच्या बाबत प्रचंड उदास अवस्थेत होता. तेंव्हा एकूणच समाजातील सुशिक्षीत स्त्रीला जगण्याचं बळ मलतीबाईंच्या साहित्यांन दिले आहे.

मालतीबाईंच्या कळयांचे निश्वास आणि हिंदोळयावर या दोन्ही साहित्यकृतीने १९३३ च्या पुढील वाड्:मय इतिहासकारांनी स्त्री अस्तित्वाचे भान आणून देणा-या आहेत. त्यांच्या कालखंडामध्ये हिंगण्याला जी मुलींची शाळा होती. त्यामध्ये बहुसंख्य स्त्रिया विधवा आणि विकेश होत्या. तसेच त्याकाळात कुमारिका अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच शाळा शिकत होत्या. मालतीबाई त्या शाळेत शिकल्यामुळे त्यांच्या काळातील विधवा आणि विकेशा यांची दयनिय अवस्था मालतीबाईंनी जवळून पाहिली होती. त्यामुळे मालतीबाईंच्या मन पटलावर स्त्रियांच्या अवनत अवस्थेला जबाबदार असणा-या समाज पुरुषांच्या संदर्भातील चिंतन व्यापकपणे व्यक्त होऊ लागले होते. एक स्त्री मन म्हणून सभोवतालचे अचूक वास्तव साहित्यातून मांडता आले हा त्यांच्या साहित्यकृतीचा मोठा विजय होता, कारण त्या काळात या प्रकारचे साहित्य लेखन झालेच नव्हते. आणि जो लिहिण्याचा प्रयत्न करीत होता. त्याला समाजाचा प्रचंड विरोधाला सामोरे जावे लागले. हे मालतीबाईंनी अनुभवले होते.

**स्त्री समस्या वास्तवरुप :-**

मालतीबाईंच्या साहित्याने त्या काळात समाज पुरुषांची अस्मिता दुखवली गेली. पण विभावरी शिरुरकर हे नाव या काळातील पुरुषप्रधान समाजाला फारसे परिचित नसल्याने. समाज पुरुषांच्या विद्रोहाची झळ मालती बेडकर यांच्यापर्यंत फारसी बसली नाही. म्हणजेच एकूण वातावरण एवढे दूषित होतं कीं, स्त्री समस्यांचे वास्तव रुप समोर ठेवले कीं, या काळातील पुरुष विद्वांनांना प्रचंड दु:ख होत होते. पण या दु:खाच्या आरंभाचा शोध फारसा कोणी घेतला नाही. मालतीबाईंच्या स्त्री म्हणून असणारा साहित्य दृष्टीकोन समाज वास्तवाचा होता, कल्पना, रम्यता आणि आदर्शवाद त्यांना मान्य नव्हते. त्यांच्या कलाकृतीतून नव शिक्षित विधवा प्रथमच स्वतःचा आई-वडिलांचा निखळपणे विचार करीत होती. तसेच आधुनिक विचारांची तरुणी घडत होती आणि उपेक्षित समाजातील माणूसही (बळी)

प्रथमच परंपरा सोडून जगण्याची उमेद बाळगणे होता. त्यामुळे त्यांच्या समकालीन कालखंड हा त्यांच्या चिंतनाचा विषय झाला. आणि तोच साहित्यातून प्रकट होऊ लागला असे म्हणता येईल.

**समारोपः-**

एकूणच असे म्हणता येईल की त्यांच्या साहित्यातून स्त्री स्वातंत्र्याची प्रेरणा घेऊन अनेक लेखिका मराठी साहित्यात वेगवेगळे जीवनानुभव स्पष्ट करु लागल्या. मराठी साहित्यातील कथा कादंब-या पुरुषाशिवाय स्त्री अनुभवाने अधिक समृध्द करु लागल्या त्यामुळे मालतीबाईंच्या साहित्याशी नातं सांगून समाजामध्ये असणा-या वर्चस्वाच्या भावनेला, स्त्री लेखिकांनी तडा दिला. मालतीबाईंचा कालखंड हा गांधीवाद, कलावाद, आणि जीवनवाद या तिन्ही पेक्षा ही मानवतावाद हा श्रेष्ठ आहे. आणि तो ही स्त्रियांच्या बाबत हे त्यांनी निर्विवाद स्पष्ट केले. आज समाज जीवन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आहे पण ही प्रक्रिया ग्रामीण भागातील स्त्री पर्यत पोहचली नाही. कारण मुक्त स्वातंत्र्याची भावना, प्रगतीच्या दृष्टीकोनातून, स्त्री मनापर्यत जोपर्यत पोहचत नाही. त्यांचा माणूस म्हणून विचार होत नाही तो पर्यत मालतीबाईंच्या कळयांचे श्वास हिंदोळेच घेत राहणार. यात शंका नाही.

**संदर्भः-**

स्त्रीवादी साहित्य - अश्विनी घोंगडे
स्त्रीपर्व - मंगला वरखेडे
मराठी लेखिका चिंता आणि चिंतन भालचंद्र फडके
स्त्री साहित्याचा मागोमा - मंदा खांडगे